डिसेंबर महिना दशकभरातील सर्वांत थंड

शिवाजीनगर येथे १०.५ अंश सेल्सिअस सरासरी किमान तापमानाची नोंद

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : संध्याकाळनंतर हुडहुडी भरवणाऱ्या थंडीचा प्रभाव जवळपास पूर्ण डिसेंबरचा महिनाभर राहिला. त्यामुळे यंदा डिसेंबरमध्ये शहरात दशकातील नीचांकी सरासरी किमान तापमानाची नोंद झाली असून, शिवाजीनगर येथे सरासरी १०.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. यंदाचा डिसेंबर महिना दशकभरातील सर्वांत थंड ठरला आहे.

उत्तरेकडून येणारे थंड वारे, निरभ्र आकाश आणि कोरड्या हवामानामुळे हवेतील गारव्यात वाढ झाली. काही दिवसांचा अपवाद वगळता डिसेंबरचा जवळपास महिनाभर शहर आणि परिसरात थंडी अनुभवायला मिळाली. सातत्याने किमान तापमान १० अंश सेल्सियसपेक्षा कमी नोंदवले गेले. २१ डिसेंबर रोजी यंदाच्या हंगामातील आतापर्यंतचे नीचांकी ६.६ अंश सेल्सियस किमान तापमान हवेली येथे नोंदवले गेले. त्या पूर्वीही शहरातील काही भागातील किमान तापमान ७ अंश सेल्सियसपर्यंत कमी झाले होते.

हवामान विभागातील नोंदींतील गेल्या दशकभरातील आकडेवारीचा आढावा घेतला असता शिवाजीनगर येथे २०१६ आणि २०१८ या दोन वर्षांतील डिसेंबरमध्ये सरासरी किमान तापमान १२ अंश सेल्सियसपेक्षा कमी नोंदवले गेले होते. तर, बाकी वर्षांत १२ ते १६ अंश सेल्सियसदरम्यान तापमान राहिल्याचे दिसून येते. मात्र, यंदा महिनाभर राहिलेल्या गारव्यामुळे सरासरी किमान तापमानात गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सरासरी १४.९ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले होते, तर यंदा १०.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले आहे. त्याशिवाय, यंदाच्या डिसेंबर महिन्यात किमान तापमान १० अंश सेल्सियसपेक्षा कमी असल्याचे सुमारे २० दिवस होते. शहरात एक अंकी किमान तापमान नोंदवले जाण्याचे दिवसांबाबतही यंदाचा डिसेंबर विक्रमी ठरला आहे. त्यामुळे गेल्या दशकभरात यंदाचा डिसेंबर सर्वाधिक थंडीचा ठरल्याचे दिसून येत आहे.

गेल्या दशकभरातील डिसेंबरमधील सरासरी किमान तापमानाची वर्षनिहाय आकडेवारी

वर्ष	-	तापमान (अंश सेल्सिअस)
२०१४	-	१२
२०१५	-	१३.४
२०१६	-	११.६
२०१७	-	१३.४
२०१८	-	११.९
२०१९	-	१६.७
२०२०	-	१३.८
२०२१	-	१४.४
२०२२	-	१४.४
२०२३	-	१४.३
२०२४	-	१४.९
२०२५	-	१०.५

तापमानात चढ-उतार होत असतात. मात्र, यंदा डिसेंबरमध्ये उत्तरेकडून येणाऱ्या थंड आणि कोरड्या वाऱ्यांचा प्रभाव जास्त काळ राहिला. तसेच, बरेच दिवस आकाश निरभ्र होते. त्यामुळे सरासरी किमान तापमानात घट झाली.
-एस. डी. सानप, शास्त्रज्ञ, भारतीय हवामानशास्त्र विभाग

राहुल नार्वेकर यांच्यावर उमेदवारांना धमकावल्याचा आरोप

अर्ज भरण्यापासून रोखल्याचा विरोधकांचा दावा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर अन्य उमेदवारांना धमकावल्याचा आरोप करण्यात आला. अर्ज भरण्यापासून १२ उमेदवारांना रोखण्यात आल्याचा दावा समाजमाध्यमांवरून करण्यात आला आहे.

शिवसेना मनसे युतीचे बबन महाडिक यांनी रांगेत असूनही अर्ज भरू दिला नसल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, नार्वेकर यांनी हे सर्व आरोप फेटाळले आहेत.

कुलाबा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक २२५,२२६ आणि २२७ या तीन प्रभागांमध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे बंधू, बहीण आणि वहिनी असे तीन जण निवडणूक लढवणार आहेत. बंधू मकरंद नार्वेकर, बहीण गौरवी शिवलकर आणि वहिनी हर्षिता शिवलकर या तिघांनी मंगळवारी अर्ज दाखल केले. मात्र या वेळी राहुल नार्वेकर हे उपस्थित होते. आपले नातेवाईक बिनविरोध निवडून यावेत याकरिता त्यांनी या तीन प्रभागांतील अन्य उमेदवारांना अर्ज भरण्यापासून रोखल्याचा आरोप १२ उमेदवारांनी केला आहे. अधिकाऱ्यांवर दबाव टाकून हे अर्ज स्वीकारण्यास मनाई करण्यात आल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे. तसेच नामनिर्देशन भरण्याच्या सभागृहात अपक्ष उमेदवारांना धमकावण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला आहे. विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी आरोप फेटाळले असल्याची माहिती त्यांचे बंधू मकरंद नार्वेकर यांनी दिली. राहुल नार्वेकर हे भाजप उमेदवारांना पाठिंबा देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात उपस्थित होते. आम्ही लोकशाही मार्गाने आणि निष्पक्षपणे निवडणुका लढवण्यावर विश्वास ठेवतो, असेही मकरंद नार्वेकर यांनी सांगितले.

ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, 8वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई - 400 063 भारत
मोबाईल : +91 8433508283` वेबसाइट : www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली अनुसूची असलेली स्थावर मालमत्ता इतर गोष्टींसह आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड ["एआरजीएफएल"] (सुरक्षित धनको) यांचेकडे सुरक्षित केलेली आहे ज्याचा कर्ज खाते क्र. **APPL00000786** आहे आणि या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे, तसेच या मालमत्तेची विक्री, खालील नमूद केल्याप्रमाणे कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांच्याकडून अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेली एकूण रक्कम आणि वसुली तारखेपर्यंतचे त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क हि रक्कम वसूल करण्यासाठी, "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर, **https://sarfaesi.auctiontiger.net** वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या दिनांकास विक्री केली जाईल :

कर्जदाराचे नाव : (1) मे. कोहिनूर फ्रूट कंपनी (कर्जदार) अपेक्षा वेअरहाऊस, स. क्र. 184, पुणे सासवड रोड, फुरसुंगी पुणे - 412308.

सह-कर्जदाराचे नाव : (2) श्री. स्टीव्ह अरोकिया दास स्वामी (सह-कर्जदार) ● ए-102, स्नेह किनारा, भाऊ पाटील रोड, बोपोडी, आयटी पार्क समोर, पुणे - 411020, ● एचव्ही23+8आरसी मयुरेश्वर गणेश मंदिर, मुळा रोड, श्री सत्यम हाउसिंग सोसायटी, खडकी, पुणे 411003. (3) सौ. कोस्टिया रिचर्ड (सह-कर्जदार) ●ए-102, स्नेह किनारा, भाऊ पाटील रोड, बोपोडी, आयटी पार्क समोर, पुणे - 411020, ● एचव्ही23+8आरसी मयुरेश्वर गणेश मंदिर, मुळा रोड, श्री सत्यम हाउसिंग सोसायटी, खडकी, पुणे 411003.

मालमत्तेचा पत्ता :- फ्लॅट क्र. 102, 1ला मजला, विंग ए, स्नेह किनारा, शांता आपटे पथ, सीटीएस क्र. 1650 ते 1666, सर्व्हे क्र. 41ए, हिस्सा क्रमांक 1ए, 2बी/1/1बी/1, बोपोडी, पुणे, 411020.

थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह)	**रु. 38,48,604/-** (रुपये अडतीस लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे चार फक्त)
लिलावाची दिनांक	20 जानेवारी 2026
राखीव किंमत	रु. 51,31,195/- (रुपये एक्कावन्न लाख एकतीस हजार एकशे पंच्याण्णव फक्त)
बयाणा रक्कम ठेव	राखीव किमतीच्या 10%
किमान बोली वाढीची रक्कम	रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची दिनांक आणि वेळ	13 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 पासून ते दुपारी 4 वा. पर्यंत
केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म / ईएमडीचा पुरावा इ. सादर करण्याची दिनांक आणि वेळ	16 जानेवारी 2026 रोजी दुपारी 4.00 वा. पर्यंत केवायसी कागदपत्रांसह
ऑनलाइन ऑफर उघडण्याची दिनांक आणि वेळ	20 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10:00 आणि दुपारी 1.00 वा. दरम्यान.

टीप : इच्छुक बोलीदार / खरेदीदार लिलाव प्रक्रियेच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी आनंद राठी ग्रुप यांची वेबसाइट www.rathi.com ला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन वरील कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि 9(1) अंतर्गत 15 दिवसांची सूचना देखील आहे.

दिनांक : 31 डिसेंबर 2025
ठिकाण : पुणे
स्वा./- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

नव्या वर्षासाठी वेगवेगळे संकल्प केले जातात. त्यातले काही पूर्ण होतात, काही अपूर्ण राहतात. काही तरुणांनी नव्या वर्षाच्या पूर्वदिनी तळजाई टेकडी येथे योगासने करून नव्या वर्षाचे स्वागत केले.

न्या. शिंदे समितीस मुदतवाढ

मराठा-कुणबी नोंदी शोधण्याचे काम आणखी सहा महिने

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी किंवा मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक नोंदींचा शोध घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्या. संदीप शिंदे समितीस राज्य सरकारने सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे.

मराठा समाजाच्या नागरिकांना ओबीसी प्रमाणपत्र मिळावे, या मागणीसंदर्भात नेते मनोज जरांगे यांनी केलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ७ सप्टेंबर २०२३ रोजी स्थापन केली होती. या समितीला मराठा समाजाला मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत, तसेच तपासणीअंती पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

कायदेशीर बाजू मांडण्यासाठी मार्गदर्शनाची अपेक्षा

या समितीने हैदराबाद गॅझेटमधून शोधलेल्या हजारो नोंदींनुसार राज्य सरकारने कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठीचे आदेश २ सप्टेंबर रोजी दिले होते. मराठवाड्यात या निर्णयाची अंमलबजावणी होत असताना उच्च न्यायालयात त्याला आव्हान देण्यात आले. त्यामुळे न्यायालयात सरकारला बाजू मांडण्यासाठी समितीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

पुणे बॉम्बस्फोटातील आरोपी बंटी जहागीरदार याची हत्या

घटनास्थळाची पाहणी करताना अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्यासह अधिकारी.

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : पुणे स्फोट प्रकरणासह इतर गंभीर गुन्ह्यांतील आरोपी; परंतु सध्या जामिनावर असलेल्या बंटी ऊर्फ अस्लम शबीर जहागीरदार याचा श्रीरामपूर शहरात बुधवारी दुपारी झालेल्या गोळीबारात मृत्यू झाला. गोळीबारात जखमी झालेल्या जहागीरदार याला उपचारासाठी अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना सायंकाळी त्याचा मृत्यू झाला. बंटी जहागीरदार याच्यावर सहा गोळ्या झाडण्यात आल्या.

दुपारी २.३० ते ३ च्या दरम्यान श्रीरामपूर शहरातील कब्रस्तानात एक अंत्यविधी आटोपून परतणाऱ्या जहागीरदार याच्यावर या भागातच दबा धरून बसलेल्या दोन हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. त्याला नागरिकांनी रुग्णालयात दाखल केले होते, तेथेच त्याचा मृत्यू झाला.

हल्लेखोर कोण होते, याची ओळख अद्याप पटलेली नाही. नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवू नये. आरोपींच्या अटकेसाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. पोलिसांच्या हाती धागेदोरे लागले आहेत. श्रीरामपूर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे प्रयत्न आहेत.
- सोमनाथ वाकचौरे अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर

महानगरपालिका निवडणुकीसाठी ३३ हजार अर्ज

मुंबई: मुंबईसह २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये पुणे महापालिकेत सर्वाधिक ३,१७९ अर्ज दाखल झाले आहेत. मुंबईत २ हजार ५१६, नाशिकमध्ये २ हजार३५६, ठाण्यात १,१२८ उमेदवारी अर्ज पात्र ठरले आहेत.

चंद्रपुरातील वाघिणीचा हिंगणघाटात मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

वर्धा : चंद्रपुरात नोंद असलेली वाघीण हिंगणघाट तालुक्यातील सेलू मुरपड ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वैजापूर येथे धरणाच्या कालव्यात मृतावस्थेत आढळली. पशुवैद्यकीय डॉक्टर आणि वन अधिकारी तसेच वन्यजीव संरक्षण समिती सदस्य यांच्या उपस्थितीत मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. वन अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन वाघिणीचा मृतदेह ताब्यात घेतला. घटनास्थळ सेलू मुरपड हे चंद्रपूरपासून तीन किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे वाघीण त्याच परिसरात ठार झाली आणि मृतदेह या कालव्यात आणून टाकल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

देशात ११८ लाख टन साखर उत्पादन

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : यंदाच्या हंगामात देशभरातील ४९९ साखर कारखान्यांनी गाळप सुरू केले आहे. चांगली थंडी, विना अडथळा गाळप आणि कारखान्यांची गाळप क्षमता वाढल्याचा चांगला परिणाम दिसून येत आहे. देशभरातील साखर कारखान्यांनी १३३९ लाख टन उसाचे गाळप करून सरासरी ८.८३ उताऱ्यासह ११८ लाख टन साखर उत्पादन घेतले आहे.

कर्नाटकचा अपवाद वगळता देशभरात नोव्हेंबर महिन्यापासून कारखान्यांची धुराडी पेटली आहेत. गेल्या दोन महिन्यांत ४९९ कारखान्यांनी १३९९ लाख टन उसाचे गाळप केले आहे.

देशभरात चांगली थंडी पडल्यामुळे साखर उतारा चांगला मिळत असून, ८.८३ टक्के साखर उताऱ्यासह ११८.३० लाख टन साखर उत्पाद झाले आहे. डिसेंबरअखेरच्या ११८.३० लाख टनांमध्ये उत्तर प्रदेशात ३५ लाख टन, महाराष्ट्रात ४८ लाख टन आणि कर्नाटकात २२ लाख टन साखर उत्पादन झाले आहे. देशातील ४९९ कारखान्यांपैकी सर्वाधिक १९७ कारखाने महाराष्ट्रातील आहेत. त्या खालोखाल ११९ उत्तर प्रदेशातील, ७५ कर्नाटकमधील, मध्य प्रदेशातील १८, पंजाबमधील १५, गुजरात, हरियाणामधील प्रत्येकी १४ आणि तमिळनाडूतील १२ कारखान्यांचा समावेश आहे.

देशात ३१५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज आहे. गतवर्षी २६१.८० लाख टन साखर उत्पादन झाले होते. थंडी चांगली पडल्यामुळे उसातील नैसर्गिक साखरेचे प्रमाण (साखर उतारा) वाढते.

मुख्य अभियंता (पथ) कार्यालय
पुणे महानगरपालिका
शुद्धिपत्रक (टेंडर क्र. PMC/ROAD/2025/231)

पुणे मनपा मुख्य अभियंता (पथ) कार्यालयाकडील वेलस्ली रोड ते जनाई माता मंदिर ने बंडगार्डन पूल पर्यंत ३० मीटर रुंदीचा डी.पी. रस्ता विकसित करणे. या कामाची जाहिरात क्र. ३/१४४० दि. ०९/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध झाली आहे.

वरील निविदेकरिता दिनांक १८/१२/२०२५ रोजी निविदा प्रसिद्धीनुसार यापूर्वी नियोजित असलेली प्री बिड मिटिंग घेण्यात आली आहे. पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता आचारसंहिता लागू असल्याने तसेच बहुतांश अधिकारी निवडणुकीच्या कामकाजात असल्याने सदर निविदेची CSD ची प्रक्रिया हि पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची प्रक्रिया संपुष्टात आलेनंतर करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने सुधारित तारखा पुढील प्रमाणे.

- निविदा विक्री कालावधी दिनांक ३०/०१/२०२६ दुपारी ३:०० वाजेपर्यंत
- अंतिम स्वीकृती दिनांक ३०/०१/२०२६ दुपारी ३:०० वाजेपर्यंत
- निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक ०२/०२/२०२६ दुपारी ३:०० वाजेपर्यंत

या निविदे संदर्भातील यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या इतर तपशील / मजकूर पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे राहील. तरी सर्व संबंधितांनी या बाबीची नोंद घ्यावी.

सही/-
मुख्य अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. ३/१५२९
दिनांक-३१/१२/२०२५

टाटा कॅपिटल लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : अकरावा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिजनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013.

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 मधील अनु. 13(2) अंतर्गत मागणी सूचना.

ज्याअर्थी, 24 नोव्हेंबर 2023 च्या आदेशानुसार, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (एनसीएलटी) मुंबई ने कलम 66 सह वाचलेल्या कलम 230 ते 232 आणि कंपनी कायदा, 2013 च्या इतर लागू तरतुदीं ("सदर योजना") अंतर्गत, टाटा कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ("टीसीएफएसएल") हस्तांतरणकर्ता म्हणून आणि टाटा कॅपिटल लिमिटेड ("टीसीएल") हस्तांतरित म्हणून यांच्यात व्यवस्था करण्याच्या योजनेला रीतसर मंजुरी दिली आहे. त्यासंदर्भात, टीसीएफएसएल (हस्तांतरणकर्ता कंपनी) आणि त्याच्या उपक्रमासह (हस्तांतरित कंपनी) मध्ये प्रभावी दिनांकास म्हणजे 1 जानेवारी, 2024 रोजी विलीन झाले आहे.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे टाटा कॅपिटल लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली दिल्यानुसार मागणी सूचना पाठविल्या ज्यांत कर्जदार/ सह-कर्जदार / बाध्यताधारी यांना संबंधित मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रकमेचा सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत खाली दिलेल्या तपशीलानुसार भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. सदर कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे टाटा कॅपिटल लि. (टीसीएल) यांचेकडे भरणा न केल्यास टीसीएल यांचेद्वारे सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) आणि लागू नियमांतर्गत संपूर्णपणे कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारी यांच्या खर्चाने व त्यांना भोगाव्या लागणारया परिणामांवर सदर अनामत मत्ता / अचल मालमत्तांविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात करतील. सदर कर्जदार/ सह-कर्जदार/ बाध्यताधारींना आमची पूर्व-परवानगी न घेता सदर अनामत मत्तांवर भाड्याने किंवा लायसन्स\वर किंवा इतर कोणत्याही पद्धतीने कोणत्याही प्रकारचा हितसंबंध किंवा अधिकार निर्माण करण्यास किंवा अनामत मत्तेचे हस्तांतरण करण्यास मज्जाव करण्यात येतो आणि ही बाब सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (13) अंतर्गतसुद्धा प्रतिबंधित आहे. हेही लक्षात घ्यावे की सदर अधिनियमातील अनुच्छेद 29 नुसार कुणाही व्यक्तीने सदर अधिनियमातील तरतुदींचे किंवा त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्याचा प्रयत्न केल्यास किंवा इतर कुणास तसे करण्यास चिथवल्यास एक वर्षाचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते. सदर कर्जदार / सह-कर्जदार / बाध्यताधारींचे लक्ष सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते ज्यानुसार आपण जाहीर लिलावाद्वारे, सर्व लोकांकडून दरपत्रके, निविदा मागविणे, किंवा खाजगी तहाद्वारे अनामत मत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापर्यंत संपूर्ण थकबाकी रकमेचा टीसीएल यांना आलेल्या खर्च, शुल्के व अधिभारांसह भरणा करू शकता. कृपया हेही लक्षात घ्यावे की आपण जाहीर लिलावाद्वारे, सर्व लोकांकडून दरपत्रके, निविदा मागविणे, किंवा खाजगी तहाद्वारे अनामत मत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापर्यंत संपूर्ण थकबाकी रकमेचा टीसीएल यांना आलेल्या खर्च, शुल्के व अधिभारांसह भरणा न केल्यास आपणांस सदर अनामत मत्ता सोडवून घेता येणार नाही. कुणाही व्यक्तीने सदर अधिनियम किंवा नियमांमधील तरतुदींचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्यास चिथवल्यास सदर अधिनियमातील तरतुदीनुसार ते कृत्य कारावास व / वा दंडास पात्र ठरेल.

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	बाध्यतादार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी यांचे नाव	मागणी सूचनेची रक्कम ----------- एनपीए दिनांक
1. 2. 3. 4. 5.	**7907760** **21794792** **TCFLA02770 00011156876** **TCFLA02770 00011702374** **TCFLA02770 00012709508**	**1. श्री. सचिन श्याम यादव (कर्जदार)** **2. सौ. मनीषा सचिन यादव (सह-कर्जदार)** **दोघेही 1 आणि 2 यांचा निवासी पत्ता :** हिल्स अँड डेल्स अपार्टमेंट, फेज-3, फ्लॅट क्र. 704, इमारत एम-13, हडपसर रोड, उंड्री, सर्व्हे क्र. 15, पुणे - 411060, **तसेच पत्ता :** दुकान क्र. 7, तळमजला, मिहिर को-ऑप हाऊसिंग सोसा., स. क्र. 19, सिग्नल जवळ, फातिमा नगर वानवडी, पुणे- 411040, **तसेच पत्ता :** दुकान क्र. 8, स्टील्ट मजला, मिहिर को-ऑप हाऊसिंग सोसा., स. क्र. 19, सिग्नल जवळ, फातिमा नगर वानवडी, पुणे- 411040, **तसेच पत्ताः** दुकान क्र. 2, तळमजला शिवकृष्ण अपार्टमेंट, स. क्र. 55, हिस्सा क्र. 11 ए1, वडगाव बीके, पुणे- 411041, **तसेच पत्ताः** दुकान क्र. 3, तळमजला शिवकृष्ण अपार्टमेंट, स. क्र. 55, हिस्सा क्र. 11 ए1, वडगाव बीके, पुणे- 411041.	**सर्व 5 कर्ज खात्यांसाठी एकूण थकबाकी रक्कम रु. 1,65,76,194/-** (रुपये एक कोटी पासष्ट लाख शहात्तर हजार एकशे चौरयाण्णव फक्त) **मागणी सूचना दिनांक - 10/12/2025** ------------------ **एनपीए दिनांक - 04.12.2024**

अनामत मालमत्तेचे वर्णन : 1) सर्व समाविष्ट असलेले दुकान क्र. 7, मोजमाप बिल्टअप क्षेत्रफळ सुमारे 325 चौ. फूट म्हणजे 30.20 चौ. मीटर, "**मिहिर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड**" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीत तळमजल्यावर, ज्याचे बांधकाम मालमत्ता संबंधित प्लॉट क्र. 3 स. क्र. 19/1 पैकी यावर झालेले आहे, महसूल गाव वानवडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणीचे अधिकार क्षेत्र उपजिल्हा तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे च्या हद्दीत. **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :-** पूर्व किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 8, पश्चिम किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 6, उत्तर किंवा त्या दिशेने : सोसायटीच्या इमारतीचा भाग, दक्षिण किंवा त्या दिशेने : पुणे-सोलापूर रोड. **2) सर्व समाविष्ट असलेले दुकान क्र. 8** मोजमाप बिल्टअप क्षेत्रफळ सुमारे 560 चौ. फूट म्हणजे 52.04 चौ. मीटर, "**मिहिर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड**" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीत **स्टील्ट मजल्यावर,** ज्याचे बांधकाम मालमत्ता संबंधित प्लॉट क्र. 3 स. क्र. 19/1 पैकी यावर झालेले आहे, महसूल गाव वानवडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणीचे अधिकार क्षेत्र उपजिल्हा तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे च्या हद्दीत. **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :-** पूर्व किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 9, पश्चिम किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 7, उत्तर किंवा त्या दिशेने : सोसायटीचा खुला भाग, दक्षिण किंवा त्या दिशेने : पुणे-सोलापूर रोड. **3) सर्व समाविष्ट असलेले दुकान क्र. 2** मोजमाप बिल्टअप क्षेत्रफळ सुमारे 135 चौ. फूट, "**शिवकृष्ण अपार्टमेंट**" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीत, **तळमजल्यावर,** ज्याचे बांधकाम मालमत्ता संबंधित सर्व्हे क्र. 55, हिस्सा क्र. 11ए/1, क्षेत्रफळ 55आर आणि सर्व्हे क्र. 55, हिस्सा क्र. 11बी/1, मोजमाप 06.75आर यावर केलेले आहे, महसूल गाव **वडगाव बुद्रुक,** तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणीचे अधिकार क्षेत्र उपजिल्हा तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे च्या हद्दीत. **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :-** पूर्व किंवा त्या दिशेने : खुले, पश्चिम किंवा त्या दिशेने : खुले, उत्तर किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 3, दक्षिण किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 1. **4) सर्व समाविष्ट असलेले दुकान क्र. 3,** मोजमाप बिल्टअप क्षेत्रफळ सुमारे 175 चौ. फूट म्हणजे 16.26 चौ. मीटर, "**शिवकृष्ण अपार्टमेंट**" म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीत, **तळमजल्यावर,** ज्याचे बांधकाम मालमत्ता संबंधित सर्व्हे क्र. 55, हिस्सा क्र. 11ए/1, क्षेत्रफळ 55आर आणि सर्व्हे क्र. 55, हिस्सा क्र. 11बी/1, मोजमाप 06.75आर यावर केलेले आहे, महसूल गाव **वडगाव बुद्रुक,** तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित, पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणीचे अधिकार क्षेत्र उपजिल्हा तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे च्या हद्दीत. **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :-** पूर्व किंवा त्या दिशेने : जिना, पश्चिम किंवा त्या दिशेने : खुली जागा, उत्तर किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 2, दक्षिण किंवा त्या दिशेने : दुकान क्र. 4. **कृपया नोंद घ्या : ही नवीन 13(2) सूचना आहे आणि आम्ही पूर्वीची दि. 10/01/2025 रोजीची 13(2) सूचना परत मागे घेतली आहे.**

तारीख : 01-01-2026
ठिकाण : पुणे, महाराष्ट्र
प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल लिमिटेड

न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कामे नको!

उच्च न्यायालयाचे पालिका आयुक्तांना स्पष्टीकरण देण्याचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मुंबईतील कनिष्ठ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कर्तव्यावर रुजू होण्यास सांगणाऱ्या मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या पत्राला उच्च न्यायालयाने मंगळवारी रात्री तातडीची सुनावणी घेऊन स्थगिती दिली. तसेच, हे आदेश कोणत्या अधिकारांतर्गत दिले ? अशी विचारणा करून आयुक्तांच्या अधिकारांवर आणि कार्यक्षेत्रावर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. एवढेच नव्हे, तर याचे स्पष्टीकरण आयुक्तांनी स्वतः प्रतिज्ञापत्र दाखल करून द्यावे, असेही आदेश न्यायालयाने दिले आहेत.

मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने मंगळवारी रात्री मुख्य न्यायमूर्तींच्या निवासस्थानी तातडीची विशेष सुनावणी घेतली. त्यावेळी न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले. तसेच, जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणूनही काम करणाऱ्या महापालिका आयुक्तांना उच्च न्यायालय किंवा कनिष्ठ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना निवडणूक कामे लावण्याबाबत कोणतेही पत्र किंवा सूचना काढण्यापासूनही रोखले.

उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय न्यायाधीश समितीने सप्टेंबर २००८ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, उच्च न्यायालय आणि सर्व कनिष्ठ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यातून सूट देण्याचे म्हटले होते. हा निर्णयही न्यायालयाने उपरोक्त आदेश देताना प्रामुख्याने अधोरेखीत करून आयुक्तांकडे स्पष्टीकरण मागवले.

विनंती फेटाळली



या प्रकरणी झालेल्या सुनावणीच्या वेळी, महापालिका आयुक्तांनी काढलेले हे पत्र मागे घेऊ देण्याची विनंती महापालिकेच्या वतीने न्यायालयाकडे करण्यात आली. तथापि, न्यायालयाने ही विनंती फेटाळली आणि जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणूनही काम पाहणाऱ्या महानगरपालिका आयुक्तांना जिल्हा न्यायव्यवस्थेच्या कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश कोणत्या अधिकार आणि कार्यक्षेत्रांतर्गत दिले हे स्पष्ट करणारे वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले.

मुंबई महानगरात पावणेदोन लाख घरे रिक्त!

सदनिकांच्या किमतीत आठ टक्के वाढ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : देशातील प्रमुख शहरांमधील घरविक्री मंदावली असून गेल्या वर्षाच्या तुलनेत त्यात १४ टक्क्यांनी घट झाली आहे. मुंबई महानगर परिसर तसेच पुण्यात घरविक्री अनुक्रमे १८ व २० टक्क्यांनी कमी झाली आहे. त्याच वेळी घरांच्या किमतीत आठ टक्के वाढ झाल्यामुळे घरविक्रीतून मिळालेल्या रकमेत मात्र सहा टक्के वाढ झाली आहे. मुंबईत अद्यापही पावणेदोन लाख घरे रिक्त आहेत.

'ॲनारॉक' या सर्वेक्षण कंपनीने देशातील सात शहरांतील घरविक्रीबाबत सादर केलेल्या वार्षिक अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. सात शहरांत या वर्षांत तीन लाख ९५ हजार ६२५ घरांची विक्री झाली तर, २०२४ अखेर चार लाख ५९ हजार ६४५ घरांची विक्री झाली होती. या आकडेवारीवरून घरविक्रीत सुमारे १४ टक्के घट झाल्याचे दिसून येते. घरविक्रीतून गेल्या वर्षी पावणेसहा लाख कोटी रुपये मिळाले होते. यंदा मात्र त्यात वाढ होऊन सहा लाख कोटी मिळाले. ही वाढ आठ टक्के आहे. घरांच्या किमतीत वाढ झाल्यामुळे घरविक्रीत घट झाली तरी महसुलात वाढ झाल्याचे अहवालात नमूद केले आहे. घरांच्या वाढलेल्या किमती हे त्यामागे कारण असून त्यामुळेच घरविक्री घटली तरी महसूल वाढल्याचे अहवाल सांगतो.

नव्या घरांच्या निर्मितीत आघाडी

नव्या घरांच्या निर्मितीत देशात मुंबई महानगर आघाडीवर असल्याचे आढळून आले. गेल्या वर्षाच्या तुलनेत ४८ टक्के नव्या घरांची घोषणा करण्यात आली आहे. यंदा अडीच कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या घरांची घोषणा झाली असून ते प्रमाण २९ टक्के आहे. सातही शहरांत एकूण चार लाखांपेक्षा अधिक घरांची विक्री झाली आहे, असे ॲनारॉक समूहाचे अध्यक्ष अनुज पुरी यांनी सांगितले.